2019-20 48A

**ISSN 0976-0377**
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

**Editor In Chief**
**Dr. Balaji Kamble**

A87   २०१९-२०

RNI. MAHMUL02805/2010/33461

IMPACT FACTOR 6.20

ISSN 0976-0377

*UGC Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

डॉ. अंजुश्रीकुमार - गव्हाणे

UGC APPROVED REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XX, Vol. II
Year -X (Half Yearly)
(July 2019 To Dec. 2019)

**Editorial Office :**
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913,09637935252,
09503814000,07276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication,
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

Price: ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Professor & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 9503814000

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Aloka Parasher Sen**
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

**Dr. Huen Yen**
Dept. of Inter Cultural
International Relation
Central South University,
Changsha City, (CHAINA)

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur. (M.S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi , Dist. Latur. (M.S.)

**Dr. G.V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

**Dr. S.D. Sindkhedkar**
Vice Principal
PSGVP's Mandals College,
Shahada, Dist. Nandurbar (M.S.)

**Veera Prasad**
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Johrabhai B. Patel,**
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

**CO-EDITORS**

**Sandipan K. Gaike**
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

**Ambuja N. Malkhedkar**
Dept. of Hindi
Gulbarga, Dist. Gulbarga,
(Karnataka State)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue:XX, Vol. II, July 2019 To Dec. 2019

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Traditional and Medicinal Importance of Azadirachta Indica Juss **M. M. Dhore** | 1 |
| 2 | Co operative Banking Reforms in India **Dr. Dadasaheb Jogdand** | 8 |
| 3 | Entrepreneurship Development for Economic Growth **C. P. Kothawale** | 13 |
| 4 | Age graphic Dark Energy Bianchi Type I Cosmological model in f(R) Gravity **Dr. V.B.Raut** | 16 |
| 5 | Prevalence and antibiotic sensitivity pattern of Escherichia coli in urinary tract infections in hospitals of Omerga region (Maharashtra), India **S. B. Mali, S. M. Dulange** | 23 |
| 6 | Microbiological Quality of Goat meat (Chevon) Sold in Latur City of Marathwada Region **Shri. G.S. Biradar, Dr. L.M. Karanjkar** | 33 |
| 7 | प्रेमचंद युग की कहानियाँ और नारी **डॉ. सूर्यकांत माधवराव दळवे** | 39 |
| 8 | मराठवाड्यातील आर्थिक आधारभूत संरचनेतील कृषी विपणन या घटकांतर्गत कृषि उत्पन्न बाजार समितीचा विकास **डॉ. सुरेश बसंतराव खोंड** | 44 |
| 9 | शालेय विद्यार्थ्यांच्या आहारात पोषण आहार योजनेची भूमिका एक अर्थशास्त्रीय विश्लेषण **डॉ. नलिनी बोडखे** | 51 |
| 10 | 'आयरनीच्या घना' मधून अभिव्यक्त झालेले दलित चित्रण **डॉ. अंकुशकुमार चव्हाण** | 55 |
| 11 | डॉ. सुधाकर मोगलेवार यांचे वाङ्मयीन कार्य **विभावरी शिवलिंग नगरे** | 61 |
| 12 | भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क **डॉ. रब्बानी आर. सय्यद** | 63 |

# 'आयरनीच्या घना' मधून अभिव्यक्त झालेले दलित चित्रण

डॉ. अंकुशकुमार चव्हाण

10 Research Paper - Marathi

वैजनाथ कळसे यांचे 'आयरनीच्या घना' हे आत्मकथन मराठी सारस्वतामध्ये एक वेगळेपण सिद्ध करते.या आत्मकथनामधून चित्रित झालेली लोहार जमात ना धड स्पृश्य ना धड अस्पृश्य. अशा अवस्थेत जीवन जगणारी ही जमात येथील प्रस्थापित व्यवस्थेच्या कात्रीत सापडलेली आहे. एकूण आत्मकथनामधून लेखक, त्याचा समाज आणि लेखकाचे शैक्षणिक व वैवाहिक जीवन याचा आलेख सुबकपणे उभा केला आहे. या व्यवस्थेमध्ये शिक्षण घेतल्यानंतर नोकरीसाठी किती खस्ता खाव्या लागतात याचे चित्रण लेखकाने प्रत्ययकारी रीतीने केले आहे, वैजनाथ हा लहान असतानाच त्याची आई मरण पावते व लेखक आईच्या मायेपासून दुरावला जातो. आईच्या मृत्यूनंतर लेखकाचा सांभाळ वडीलच करतात. वडिलांच्या छत्रछायेखाली शिक्षण घेत असताना लेखकाला अनेक समस्यांना तोंड देत आपले शैक्षणिक मार्गक्रमण करावे लागते. प्राथमिक शिक्षण घेत असताना मावशी-काकाकडे राहावे लागले. त्या वेळेस अनेक प्रसंग आले पण लेखक खचून गेला नाही. शेवटी-शेवटी तर मावशी -काकाने घरातून हाकलून दिले असतानाही शिक्षणासाठी जी मनामध्ये जिद्द होती ती मात्र लेखकाने कधीच ढळू दिली नाही. लहान असताना सुध्दा शाळेसाठी पाच-सात मैल पायाखाली तुडवून लेखकाने आपले शिक्षण पूर्ण केले. आई वारल्यानंतर वडील मात्र लेखकाला मायेने सांभाळायचे. ही जीवनाची एकूणच करूण व्यथा-वेदना वैजनाथच्या वाट्याला आली. ही वेदना लेखकाने आयुष्यभर शिदोरी म्हणून जतन करून ठेवली. आत्मकथनाच्या माध्यमातून जनमाणसासमोर या व्यथा-वेदनांचे चित्रण करून ते शब्दरूपाने ठेवले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना देगलूरचे वसतिगृह व प्राचार्य धर्माधिकारी सर हे लेखकाच्या शैक्षणिक वाटचालीमध्ये दोन आधारस्तंभ भेटले म्हणूनच ते पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करू शकले. देगलूर महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असताना अनेक कडू-गोड प्रसंग लेखकाला पचवावे लागले. त्याचबरोबर बहुविध स्वभावाचे मित्र, महाविद्यालयाची विद्यार्थी

प्रतिनिधीची निवडणूक ,यामूळे विद्यार्थ्यांचे वितुष्ट स्वीकारावे लागले. त्यानंतर पुणे विद्यापीठामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी करावी लागलेली आताटतीची पराकाष्टा, लेखकाचा विवाह या एकूणच घटनांचा लेखकाच्या मनावर खोलवर परिणाम झाला. पदव्युत्तर शिक्षणानंतर नोकरीसाठी करावी लागलेली पळापळ व शेवटी नैराश्य पदरी आले. यातूनच 'आयरनीच्या घना' या आत्मकथनाचा पट उलगडत जातो . हे आत्मकथन निराशेला, आशेची जोड देऊन शेवटपर्यंत मार्गक्रमण करते.

लोहार या जातीत जन्म झाल्यामुळे लेखकाच्या वाट्याला असंख्य वेदनांना तोंड द्यावे लागले. घर वेशीच्या बाहेर बलुतेदार म्हणून आपले जीवन जगत होते. त्या वेळेस ज्या काही प्रसंगाला तोंड द्यावे लागते त्याचे सचित्र दर्शन लेखक घडवताना म्हणतो -"मी मुळच्या म्हराठवाड्यातला. माजं जेलम गाव रांकोळ. रांकोळचा ता. मुखेड तर जि. नांदेड. रांकोळच्या शिवाराला कर्नाटकातील बीदर जिल्ह्याचा शिवार भिडलेला. तर तेलंगणाची सीव साताट कोसावर. तसंच मी ज्या जातीत जन्मलो ती जात धड स्पृश्य न्हाई आन अस्पृशबी न्हाई. हामची घरंबी धड येशीभाईर ना येशीच्या मंदी. गावातल्या म्हराटी, वान्या- कोमटैला, म्हारा मांगाचा इटाळ व्हवूने मनून की काय की, हामची घरं बफरची काम करत्यात .आज सेमी गवर्नमेंटंचा जसा वर्ग हाय, तसंच मंटलं तर हामी सेमी भटके आन मंटलं तर गावगाड्यातील सेमी बलुतेदार. यका पंचक्रोशीत पोट भरना झालं की, डोस्क्यावर हात-भाता, काटी-भाता, नायतर पंका भाता घेऊन आराच्या आगीत लकौंड कुटून पोट भरणारी हामची जात.ज्या पंचक्रोशीत पोट भरायला मिळालं तितंच न्हाऊन, सुतार, वारिक, म्हारा- मांगा संगट बसून बलुतं मागणारा ल्हवार न्हायतर पोट भरंल तिकडं कुत्र्यासारंक फिरनं त्यांच्या पाचवीला पुंजलेलं ."

शिक्षण घेत असताना लेखकाच्या वाट्याला आलेलं जिणं हे सर्वसामान्यांना गहिवरून टाकणारे आहे. मावशी-काकाकडे लेखक प्राथमिक शिक्षण घेत असताना लेखकाचे वडील अन्न-धान्य वेळेवर घेऊन न आल्यामुळे लेखकाला घरातून हाकलून देण्यात आले. पण लेखकांनी आपला शैक्षणिक प्रवाह न ढळू देता शिक्षण चालूच ठेवले याविषयी लेखक म्हणतो -" हिवाळ्याच्या सुट्टया लागल्या परिक बाबाचा काई पत्ताच नव्हता. 'तुजा बाबा हामचे मनबर दाने कव्वा देनार हाय रं? मनून मावशी, काका पुसत व्हते. यका मानसाच्या हाती कळवूनबी, धा-पंधरा रोज व्हऊन गेल्ते, परिक बाबाचा काई पत्ताच न्हवता. एका रोजी काकानं माजं न्हानगं पतराचा संदूक भाईर घेऊन येयाला सांगिटला माजे सगळे वया, पुस्तकं भरायला लावून 'सुदर तुज्या गावाला. पुन्ना इकडं तोंड दावलास तर टांगडं धरुन आपटीनच बग बुडवे कांडाळीचे कुटले की, कुना कुनाचे घरं बुडवता निगालाव रं. मी बी तुमच्याऊन लई स्याना हावं. तुमच्या सरकैच्या स्यानपनवालैला खडक्याच्या बाजरात धा येळा इकून येतो."

देगलूरला शिक्षण घेत असताना लेखक वसतिगृहामध्ये राहत होता. वसतिगृहामध्ये सर्वच मुले जवळपास गरीब व मागासवर्गीय होते. त्यांच्या वाट्याला आलेलं जीवन हे जगावेगळे होते.

लेखकाची एकूण स्थिती शिक्षण घेण्याच्या विरोधातलीच. त्यातही तो शिक्षणासाठी धडपड करणारा दिसतो. वडिलांसोबत भटकंती करून शेर-पसा जमा करून महाविद्यालयापर्यंत मजल मारतो. समाजामध्ये पूर्वीपासून शिक्षकाचे नैतिक वजन होते. पण आज ते काळाच्या ओघामध्ये कमी होत आहे. सोनीसाठी एकमेकांचे डोके फोडून घेणारे शिक्षण गावातील चर्चेचा विषय झाले होते. या शिक्षकांचा विवाह होऊनही वर्गातील एकाच मुलीसोबत ते लगट करण्याचा प्रयत्न करतात. यातून त्यांचे भांडण विकोपाला जाते. सोनीविषयीचं हे भांडण पाहून गावातील मंडळी वैतागून शिक्षकांना शिव्या देतात. शिक्षण क्षेत्रातही अपवित्रतेचे वारे घुसल्यामुळे गावातील लोक सर्वांनाच नावे ठेवतात. अशा या ज्वलंत विषयावरील परिस्थितीचे चित्रण करताना लेखक म्हणतो-"सोनीच्या घरच्या पायऱ्यावर इज्ञानाचे गुर्जी हाता-पायाला पट्टी बांधून बसल्ते. लोकबी काईच्या बाई आचकट इचकट बोलत व्हते. भाईर गल्लीचा नरसिंग्या मनत व्हता. 'खज्ज्याळीच्या, दोनीबी मास्तरैला बायका-लेकरंबाळं आसूनबी शेन खात फिरत्यात. बर खाल्लेतर खाल्ले पचून तर खावावं की न्हाई. सोनी आदी तुला की मला ह्येच्यावरुन फोकनीचैनी डोस्क फोडून घेटल्यात, आनिक मास्तरं हाई मनं कस्याला की, कंडाळीचे कुटले की वरुन मन्त्यात हामच्यातल्या पैस्याच्या देन्या घेन्यावरुन मारा मारी झाली मनून."जीवन जगण्यासाठी लेखकाला मामासोबत राहून भीक मागून जीवन कंठित करावे लागले. प्रत्येक घरी जाऊन मागत असताना लेखकाचा स्वाभिमान जागृत व्हायचा पण भूक मात्र त्या वरपांगी स्वाभिमानाला उद्ध्वस्त करून टाकत होती. एका वर्गामध्ये शिक्षण घेत असलेली मुले-मुली तुच्छ नजरेने लेखकाकडे पाहत होते. लोहार आला म्हणून हिनवायचे. याविषयी लेखक म्हणतो - "माऱ्या वर्गातलेच भटा-बामनैची पोरं- पोरी कुरकुरल्याने दाने हामच्या पदरात वतताळा, बोटबर पोरं परीक मामाला आरंतुरं करायची मज्याकडं बगून कस्सं तरीच हासायचे. मला तर मेल्यावानीच वाटायचं. बामन, कोमटी तर हामाला वाड्याच्या मदी येऊच देयाचे न्हाईतं. 'लोहार आलयरे.पहा जरा त्याला 'आसं कुनीतर मंटल्यावर एक आद्र्या घंट्यानं कोन तर येऊन मोड फुटल्याले न्हाय तर बुरसी चडलेले मूग न्हाय तर उडीद पदरात टाकायचे."

गावगाडा बलुतेदारावर चालतो. मात्र बलुतेदारांची हेळसांड करीत हा गाव त्याला कायम छळत आला आहे. ही बलुतेदारी प्राचीन काळापासून चालत आली असल्याने ती एकाएकी मोडता येणे शक्य नसते. या बलुतेदारीत जगत असताना लेखक अनेकविध प्रश्नांनी गोंधळून जातो. त्याला अन्न, वस्त्र,निवारा या मूलभूत गरजापासून दूर राहावे लागत होते. यामुळे जीवनाविषयी खंत त्याच्या अंतर्मनामध्ये सातत्याने घर करून राहाते. याविषयीचे अनेक अनुभव लेखकाने या आत्मकथनात सचित्र रेखाटले अशा परिस्थितीत जगाव्या लागणाऱ्या आपल्या जमातीचे चित्रण करताना लेखक म्हणतो- "अर्धवट बलुतेदारी आणि अर्धवट भटकंती करणारा लोहार आणि मुख्य म्हणजे ऐपत नसल्याने पक्के घर बांधता येत नाही. घरात पुरेशी कोणतीच व्यवस्था नाही. पितळी स्टीलची भांडीही

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XX, Vol. II, July 2019 To Dec. 2019 

घरात नाहीत. त्याऐवजी 'जरमन ' ची भांडी वापरात आहेत. ज्याच्या आसाम्याची कामे केली . त्याच्या घरून भाजी -भाकरी आणायच्या आणि त्यावर गुजरान करायची. भाजी -भाकरी मिळाली नाही तर गोसांव्याच्या घरून त्याने भीक मागून आणलेल्या बारा मिसळीच्या पीटावर पोट भरायचे." अशी ही जगण्याची पद्धत. घरात वापराची भांडीही जनसामान्यासारखी नसतात. वाटेल त्या परिस्थितीला तोंड देऊन पोटात बारा मिसळीचे धान्य घुसडावे लागते.

देगलूर महाविद्यालय देगलूर येथे शिक्षण घेत असताना अनेक आर्थिक संकटांना लेखकाला तोंड द्यावे लागते. वसतिगृहात राहून वाटेल त्या परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते ; परंतु प्राचार्य धर्माधिकारी यांच्यासारखी भली माणसे भेटल्यामुळे मनाला धीर येतो. लेखकाच्या गुरुंची दातृत्व शक्ती पाठीशी होती. त्यामध्ये धर्माधिकारी सरांचा वाटा मोठाच आहे. याचे चित्रण करताना लेखक म्हणतो -"'हो साहेब ' मनून त्यांच्या ऑफिसच्या भाईर इऊन एका कागदावर अर्ज खरडून पाच मिनिटांच्या आत सायेबाच्या पुडं टेबलावर अर्ज ठिवला. लगेच सायेबानी अर्ज डोळ्याखालून घातलाच अर्जावर शेरा मारुन माज्या हातात अर्ज देऊन 'अर्ज घेऊन कलार्ककडे जा आणि तिथे परीक्षा फॉर्म भरुन दे' मन्ताच दिलेला अर्ज सायेबाच्या हातातून गरबडी -गरबडीनं घेऊन कलार्ककडे जात व्हतो. जाता जाताच सायेबानं मारलेल्या अर्जावरच्या लालशाईच्या शेऱ्यावरुन नजर फिरवली, तर माजे माय जागच्या जागी खिळून ऱ्हायले. 'माझ्या पगारातून कापून घेणे' असा शेरा आन सायेबाची सई व्हती." असे शिक्षक मिळाल्यामुळे लेखकाला धीर येतो. आपल्या शिक्षकाचे मोठेपण, त्यांच्या वृत्तीतील सच्चेपणा लेखकाने सच्चेपणाने नमूद केला आहे.

लेखक हा इंग्रजी विषय राहिल्यामुळे वैफल्यग्रस्त झाला होता. आपण बी.ए. ला नापास झालो तर आपल्या भावी आयुष्याचे काय होईल. त्यामुळे त्यांच्या मनामध्ये आशेची जागा नैराश्येने घेतली होती त्यामुळे या नैराश्येतून आत्महत्येचा विचार करतो. या प्रसंगाचे चित्रण करताना लेखक म्हणतो-" टोपन उचलून घाटलो घस्यात, टोपनातले थेंब जीबीवर पडताच कडूस्यार इकं काळजापस्तोर . चर-चर पोळत गेल्यावनी झालं. वरून दोन घोट पानी पिऊन, चुळा भरून टाकलो. मला वाटलं व्हतं, इक पिल्या पिल्या पट मनून जींव जाईल मनून. परिक पारबर व्हवून गेलं तरीबी काईच वाटत न्हवतं, 'हेच्या मायला ह्या यंड्रोलमदीबी काई जीव हाय की न्हाई? मनत आनिक थोडं मनून सिसीकडं जात व्हतो, परिक तेवड्यात थोडसं गरगरल्यासारकं वाटलं. मग सिसिचं टोपन गच्च लाऊन शिसी देवळीतल्या दप्तराम्हागं खुपसून टाकलो. डोळ्याम्होंर सगळं घर गरगरायला लागलं ."

शिक्षणासाठी परिस्थिती नसल्यास भटक्या जाती-जमातीच्या तरूणांची प्रातिनिधिक प्रतिक्रिया वरील उताऱ्यावरून आपणास मिळते. पदव्युत्तर शिक्षण घेऊनही नोकरी मिळणे अवघड झाल्यामुळे या एकूणच कुचकामी शिक्षण व्यवस्थेविषयी लेखकाच्या मनामध्ये चिड निर्माण होते. या शिक्षणव्यवस्थेची शोकांतिका लेखकाच्या वाट्याला आलेल्या जीवनावरून सहज कळते. या शोकांतिकेचे चित्रण

लेखक पुढील शब्दात करतो -" मला आंग मोडून काम करायची काय लाज वाटत न्हवती. एक दोन म्हैनेबी नागुदाच्या हाताखाली काम केलो अस्तो, तर ल्हवारी-सुतारीचं काम आलं आस्तं. परिक आपून सोळा वर्ष शिक्षणासाठी खर्ची घातले. त्येच्यासाठी सा-सा म्हैने यक येळ जेऊन काडलो. धा वर्साचा आस्तान्हा चार-चार कोसांची भोय उनातानात तुडवून स्याळा केलो. त्येचं फळ म्हणून की काय माजी आवस्ता रगत पित्यावनी झाल्ती ." ही जीवनाची अवकळा लेखक सहज शब्दात व्यक्त करतो. या आत्मकथनातील अनेक प्रसंगातून लेखकाने लोहार जमातीच्या जीवघेण्या अवस्थेचे चित्रण केले आहे. शिक्षण पूर्ण करूनही शेवटी वाट्याला येते ती निराशा. मग या निराशेत आत्महत्येशिवाय पर्यायच उरत नाही. ही स्थिती शिक्षण घेतलेल्या तरुणाची. आजही या जमातीतील लोक पारंपरिक व्यवसाय करताना दिसतात. या आत्मकथनाचे वैशिष्ट्य म्हणजे देगलूर, मुखेड, कंधार या परिसरातील बोली भाषेचा वापर. 'आयरनीच्या घना' हे आत्मकथन या व्यवस्थेतील शैक्षणिक वाटचालीचे उघड दर्शन घडवते. हालाखीच्या परिस्थितीमध्ये आपले जीवन व्यथित करून पदव्युत्तर शिक्षण प्राप्त केलेल्या लेखकाला नोकरी मिळणे किती अवघड आहे. याचे लेखकाने घडवलेले वास्तव दर्शन आपणास विचार करायला भाग पाडते. याबरोबरच या आत्मकथनातील व्यक्तिचित्रणाचा विचार करता, लेखकाच्या वडिलांचे चित्रण ठसठसीत उतरले आहे.

**निष्कर्ष :**

१. स्पृश्यतेच्या वेदनेतून दलित जीवन चित्रित करणारे 'आयरनीच्या घना' हे मराठी साहित्यातील पहिले आत्मकथन आहे.

२. लेखकाने या आत्मकथनातून समाज, लेखकाचे शैक्षणिक व वैवाहिक जीवन अत्यंत समृद्धपणे व सुबकतेने उभे केले आहे.

३. शैक्षणिक जीवनानंतर नोकरीसाठी करावी लागलेली पळापळ आणि नोकरी प्राप्तीनंतर जीवनात आलेले नैराश्य वाचकांचे अंतःकरण पिळवटून टाकणारे आहे.

४. जीवनातील दुःख, दारिद्य व भटकंतीचे चित्रण विविध घटना प्रसंगातून उभे केल्यामुळे जीवंत आणि रसरशीत वाटणारे आहे.

५. 'आयरनीच्या घना' या आत्मकथनाचे वैशिष्ट्य म्हणजे देगलूर, मुखेड आणि कंधार या परिसरातील बोली भाषेचा वापर केल्यामुळे आत्मकथनाला वाङ्मयीन महत्व प्राप्त झाले आहे.

## संदर्भ सूची :-

१. वैजनाथ कळसे, 'आयरनीच्या घना', साकेत प्रकाशन, गांधी नगर, औरंगाबाद-१९८६
२. डॉ. प्रल्हाद लुलेकर, 'वेदनांचा प्रदेश',कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद